MHBI110019742024

# नियमित दावा क्र. ४७२/२०२४ मधील

# निशाण ८ वरील आदेश

दावा प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुद्ध वाद मिळकतीचे हद्यबंदी करुन मोजणी प्रमाणे पुन्हा कायम करुन अहवाल मागविणेबाबत आणि निरंतरची ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. सदरचा अर्ज वादीने दावा मिळकतीची तालुका निरीक्षक भुमि अभिलेख कार्यालयामार्फत रेकॉर्ड प्रमाणे मोजमाप करुन आणि हद्दी खुणाचे दगड दर्शवुन मोजणी होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार वाद मिळकत मौजे पाचेगाव येथे गट नं.६५१ मधील ६० आर क्षेत्र असून वादी त्याचा मालक व कब्जेदार आहे. प्रतिवादीने चारही बाजुने बांध फोडी करुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे काही क्षेत्र प्रतिवादीच्या ताब्यात गेल्याचा संशय वादीला आहे. दाव्याचा महत्वाचा मुद्या म्हणजे, अतिक्रमणाचे क्षेत्र आहे. सबब, वादग्रस्त मिळकतीचे भुमी अभिलेख कार्यालयामार्फत मोजताप होवून हद्यीखुणा कायम करुन अतिक्रमीत क्षेत्र दर्शवणारा अहवाल नकाशासह न्यायालयासमोर दाखल होणे गरजेचे आहे. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली.

३. सदरच्या अर्जावर कोणत्याही प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल केले नाही.

सबब, अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

४. वादीने नि. ११/ड येथे उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय गेवराई यांना केलेला मोजणीचा अर्ज दाखल केला आहे. शिवाय वादीचे दि. २१.०८.२०१३ रोजीच्या खरेदीखताची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. ज्यावरुन गट नं. ६५१ मधील सुमारे ६० आर इतकेक्षेत्र वादीला विक्री झाल्याचे दिसून येते. सबब, वादीची मालकी वादातीत नाही. याकामी वाद मिळकतीवर अतिक्रमण झाले आहे किंवा कसे यासाठी न्यायालयामार्फत तालुका अधिक्षक भुमी अभिलेख, गेवराई यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होवून त्यांचा अहवाल अभिलेखावर येणे गरजेचे वाटते. अर्ज मंजुर झाल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. शिवाय अतिक्रमणाचे क्षेत्र निश्चित होण्यास मदतच होणार आहे. सबब, वादीचा दावा आणि मागणी लक्षात घेता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख गेवराई यांची न्यायालय आयुक्त म्हणून नेमणुन होवुन दावा मिळकतीची मोजणी होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. तालुका निरीक्षण भुमी अभिलेख गेवराई. ता. गेवराई, जि. बीड यांची न्यायिक आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते व त्यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी गट क्र.६५१, एकुण क्षेत्र ७ हे ३८ आर **पैकी ६० आर पोटखराबा ०.०१ आर** या क्षेत्राची हद्यबंदी करुन मोजणी प्रमाणे खुणा कायम करुन दगड रोवून पंचनामा

करुन या न्यायालात अहवाल सादर करावा. तसेच अतिक्रमित क्षेत्र असल्यास त्यावर नोंद करण्यात यावी.

३. न्यायालयील आयुक्तांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी अतिक्रमण केलेले क्षेत्र असल्यास सदर अतिक्रमीत क्षेत्र निश्चीत करावे. सदरचा अहवाल या आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत दाखल करावा.

४. वादीनी आवश्यक ते मोजणी शुल्क तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय गेवराई येथे भरावे.

५. आवश्यक त्या पुर्ततेनंतर रिट इश्यु करण्यात यावे.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.09.25 15:34:01 +0530

**स्थळ – गेवराई** **(श्रुती ह.पाटील)**

**दिनांक –२५/०९/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**

**गेवराई**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 25.09.2025 |
| Transcribed on | :- | 25.09.2025 |
| Checked & Signed on | :- | 25.09.2025 |

Sd/-
(A.K.Joshi)
Jr.Clerk